# मेडिकल व इंजिनिअरिंगचे ध्येय असणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता १०० टक्के पर्यंत स्कॉलरशीपसाठी दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता टेस्ट २५ मार्च व १ एप्रिल ला होणार

**अकोला दि.२२:** शासकीय व नामांकित वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात हजारों विद्यार्थ्यांना प्रवेशाकरीता पात्र करून त्यांचे डॉक्टर व इंजिनिअर चे स्वप्न साकार करणारे प्रदीर्घ अनुभवी ललित काळपांडे सरांच्या ललित ट्युटोरिअल्समध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-२० करीता ११ वी, १२ वी, निट (वैद्यकीय) व जे.ई.ई. (अभियांत्रिकी) महाविद्यालयात प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या पूर्व परीक्षेच्या कोचिंगसाठी आयोजित विशेष कॅप्सूल बॅचमध्ये प्रेवशास इच्छुक सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळावी याकरीता प्रवेश परीक्षा (एन्ट्रन्स टेस्ट) आयोजित केली आहे. यावर्षी दहावीची परीक्षा देणाऱ्या विशेषतः विदर्भ व मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचा एन्ट्रन्स एक्झामच्या रजिस्ट्रेशनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून यासाठी रजिस्ट्रेशनची प्रक्रिया अंतिम टप्प्यात अज्ञासहे. प्रवेश परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांनाच या विशेष कॅप्सुल बॅचला प्रवेश दिला जाईल. प्रवेश परीक्षेच्या गुणवत्ता यादीत येणाऱ्या पहिल्या प्रत्येकी २० विद्यार्थ्यांना क्लासेसतर्फे १०० टक्के पर्यंत स्कॉलरशीप जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रीय स्तरावर २०२० मध्ये होणाऱ्या मेडिकल व अभियांत्रिकी पूर्व परीक्षेची कसून तयारी करून घेण्यासाठी शैक्षणिक क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट निकाल देवून अकोल्याला संपूर्ण महाराष्ट्रात नावलौकिक मिळवून देणारे काळपांडे सर यांच्यासह राष्ट्रीय स्तरावर या परीक्षेसाठी शिकविण्याचा १५ ते २० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळेल.

क्लासेसने आतापर्यंत उच्चांक गाठणारे निकाल दिलेले आहेत. यात २०१४ च्या निकालामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाकरीता ८२ व अभियांत्रिकी महाविद्यालयाकरीता ५९, वर्ष २०१५ च्या निकालामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाकरीता ९८ व अभियांत्रिकी महाविद्यालयाकरीता ७६ तर वर्ष २०१६ च्या निकालामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाकरीता १०८ व अभियांत्रिकी महाविद्यालयाकरीता ९४ विद्यार्थ्यांनी काळपांडे सरांच्या मार्गदर्शनात सर्वोत्तम निकालाचा चढता आलेख दिला व यशाची परंपरा कायम राखत के.ई.एम., सायन, नायर, जे.जे. कूपर - मुंबई, बी.जे.एम.सी. पुणे, जि.एम.सी. नागपूर, आय.जी.एम.सी. नागपूर, जी.एम.सी. औरंगाबाद, जी.एम.जी. अकोला, चंद्रपूर, यवतमाळ, धुळे इत्यादी महाराष्ट्रातील वैद्यकीय क्षेत्रात सर्वोत्कृष्ट व प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या महाविद्यालयात प्रवेशाचे स्वप्न साकार केले आहे. तसेच यावर्षी म्हणजेच २०१७ च्या निकालात शर्व रणजित पाटील ७२० पैकी ६५७ गुण घेवून महाराष्ट्रातून सातवा आला. सौरभ भांगडे ७२० पैकी ६३६ गुण घेवून यवतमाळ जिल्ह्यातून प्रथम, आयुष भुतडा ७२० पैकी ६१७ गुण घेवून बुलढाणा जिल्ह्यातून प्रथम, राघव खंडेलवाल ७२० पैकी ६११ गुण, अजय राजपूत ७२० पैकी ६०६ गुण, शिव कंदोई ७२० पैकी ५९७ गुण, साक्षी सोमाणी ७२० पैकी ५९७ गुण, मुस्कान खेतान ७२० पैकी ५८८ गुण, जान्हवी नंदाने ७२० पैकी ५७६ गुण यासोबत अनेक विद्यार्थ्यांनी ५७५ च्या वर गुण प्राप्त करून नेत्रदिपक यश प्राप्त केले आहे. त्याचप्रमाणे ३९ विद्यार्थ्यांनी ५०० चे वर गुण प्राप्त केलेले आहेत. यावर्षी काळपांडे सरांच्या मार्गदर्शनाने वैद्यकीय क्षेत्रात ११९ तर अभियांत्रिकी क्षेत्रात १०२ विद्यार्थ्यांनी नामांकित महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चीत करून बाजी माजी मारली हे विशेष.

वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रासह इतर सर्वच क्षेत्रातील घेण्यात येणाऱ्या परीक्षा भविष्यात ऑनलाईन पध्दतीने होतील याची शक्यता नाकारता येत नाही. ही शक्यता लक्षात घेवून या ऑनलाईन परीक्षांमध्येही आपल्या भागातील विद्यार्थी मागे राहू नये याकरीता काळपांडे सरांनी क्लासेसच्या तसेच बाहेरगावच्या विद्यार्थ्यांसाठी ललित एज्युटॅब उपलब्ध करून दिला आहे. या टॅबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची उपरोक्त परीक्षांची सखोल तयारी करून घेतली जाईल. त्याचप्रमाणे क्लासमधील अथवा बाहेरील कुठल्याही विद्यार्थ्याला तज्ज्ञ प्राध्यपकांद्वारे तयार करण्यात आलेल्या मोफत टेस्ट सिरीज (ऑनलाईन), परीक्षेसंबंधात माहिती, शंका, प्रश्न असल्यास त्या ललित एज्यु ॲपच्या माध्यमातून सोडविता येतील. ललित एज्युॲप हो कोणत्याही मोबाईलमध्ये प्लेस्टोअर वरून सहज डाऊनलोड करता येतो. ललित ट्युटोरिअल्स मधील क्लासरूम या अद्यायावत तंत्रज्ञानाने परिपूर्ण आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकाशनाची असंख्य पुस्तकांचा संचय असलेले अभ्यासाकरीता अद्यायावत ग्रंथालय आहे. एकंदरीत वैद्यकीय व अभियांत्रिकीचे स्वप्न बाळगणाऱ्या विदर्भ व मराठवाड्यातील विद्यार्थ्यांकरीता महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट अद्यायावत कोचिंग इंस्टीट्युट आहे.

यावर्षी दहावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या सुविधेसाठी क्लासने २०२० मध्ये होणाऱ्या मेडिकल व इंजिनिअरिंगच्या प्रवेशपूर्व परीक्षेच्या या कॅप्सुल बॅचमध्ये प्रवेशासाठी घेण्यात येणारी एन्ट्रन्स एक्झाम रविवार दि. २५ मार्च २०१८ व रविवार दि. १ एप्रिल २०१८ रोजी अशी २ दिवस ठेवण्यात आली आहे. एन्ट्रन्स एक्झाम ही इयत्ता १० वी च्या गणित व विज्ञान अभ्यासक्रमावर आधारीत वस्तुनिष्ठ (ऑबजेक्टीव्ह) प्रश्नप्रणालीवर राहील. विद्यार्थ्यांना एन्ट्रन्स एक्झामच्या निकालावर आधारीत गुणानुक्रमेच काळपांडे सरांच्या मेडिकल व इंजिनिअरिंग करीता परिपूर्ण कॅप्सूल बॅचमध्ये स्कॉलरशिप व प्रवेश देण्यात येणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी या एन्ट्रन्स एक्झाम करीता नाव रजिस्ट्रेशन करण्यासाठी काळपांडे सरांच्या ललित ट्युटोरिअल्स, पाण्याच्या टाकीजवळ, तोष्णीवाल लेआऊट, अकोला येथे संपर्क साधावा असे क्लासच्या व्यवस्थापकांनी कळविले आहे.

# शासनाचे धोरण सहकार क्षेत्राला खिळखिळे करणारे सभापती प्रवीण वाघमारे व अध्यक्ष शिवाजी बंड

(ज्ञानेश्वर बोराळकर)

**चांदूर बाजार दि.२२:** राज्यातील सहकार क्षेत्र भाजपाविरोधी पक्षाच्या ताब्यात असल्याची खंत सरकारला असल्यामुळे विविध प्रकारचे नियम व अटीची आडकाठी आणण्याचे धोरण शासनाने सतत चालविल्याची स्पष्टोक्ती येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रवीण वाघमारे व खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष शिवाजीराव बंड यांनी आमच्या वार्ताहाराने केलेल्या एका वार्तालापात केली. या विषयात त्यांनी सांगितले या सहकार क्षेत्रातील दोन संस्था शेतकऱ्यांच्या हितास्थ झटणाऱ्या संस्था आहे. या प्रती शासनाचे धोरण एका वेगळ्या मार्गाने जात असल्यामुळे त्या डबाघाईत गेल्या व जात आहेत. सेस व कमिशनच्या पोटी शासनाकडून या दोन संस्थानां जवळपास १ कोटी रुपय दोन वर्षापासून घेणे आहे. शासनाच्या हमीभाव शेतमाल खरेदी व्यवहाराची एजेंसीचे रुपात खरेदी विक्री संघ काम पाहते. यासाठी संस्थेने पगारदार कर्मचारी नियुक्त केलेत. शासन एजंसीच्या माध्यमातून खरेदी


प्रविण वाघमारे


शिवाजी बंड

रकमेच्या ५ टक्के रुपये आर्थिक मोबदला देते. गेल्यावर्षी ८२ हजार ९६७ क्विंटल तुर नाफेडने व शासनाने खरेदी केली याची किंमत ४१ कोटी ८९ लाख ७५ हजार ५२२ रुपये होते. यापोटी खरेदी विक्रीसंघाला ३८ लाख रुपये घेणे आहे. यावर्षी तुर - हरभरा खरेदी सुरू करण्यात आली. परिणामी ही संस्था अडचणीत आली आहे. अशीच गत कृषी उत्पन्न बाजार समितीची झाली आहे. बाजार समितीच्या अंतर्गत उत्पन्न वाढविणारे काही उपक्रम शासनाने बंद केलेत. खरेदी व्यवहारातील सेसपोटी ४५ लाख ७८ हजार ४७४ रुपये गेल्या तीन वर्षापासून शासनाने बाजार समितीला अदा केलेले नाहीत सोबतच सन २०१४ ते २०१८ मधील तुर खरेदी सेस पोटीचे ४४ लाख ७६ हजार ४४६ तर सन २०१६ मधील ज्वारी खरेदीच्या सेसचे ८२ हजार २८ रुपये घेणे आहे. यंत्रणेतील पगाराचा प्रश्न व खर्च हे कसा चालवावा असा प्रश्न वरील संस्था प्रमुखांनी व्यक्त करून डबाघाईस येत असलेल्या या संस्थांना त्वरीत आधार देवून हा प्रश्न निकाली काढावा असी मागणी या वार्तालाप प्रसंगी व्यक्त केली. या वार्तालापाप्रसंगी उपसभापती कांतीलाल सावरकर, संचालक हरिभाऊदादा बोंडे, माजी सभापती मंगेश देशमुख, मनोज जयस्वाल, अरविंदराव लंगोटे, मनोज बाबुलाल नांगलीया, अमोल लंगोटेसह इतर संचालक उपस्थित होते. तर खरेदी विक्री संस्थेचे संचालक कांतीलाल सावरकर, शेकार, संचाकल असलेले भाजपा नेते नंदकुमार मडघे, संजय गुर्जर व राष्ट्रवादीचे नेते सुरेशराव विधाते, धाणोऱ्याचे प्रगतीशील शेतकरी नेते तथा सावंगा विठोबा संस्थाचे संचालक कृपासागर राऊत आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांप्रती भाजपा सरकारचे उदासीन धोरणाचे साक्षीदार भाजपाचे नेते नंदकुमार मडघे

(ज्ञानेश्वर बोराळकर)

**चांदूर बाजार दि.२२:** अच्छे दिनाचे स्वप्न दाखविणाऱ्या भाजपाला देशातच काय तर राज्यात सुध्दा सत्तास्थानी बसविण्यात कशाचीही उणीव भास न देता आशेवर शिक्कामोर्तब केले. मात्र आज आपले भ्रमनिरास झाला या विवंचनेत शेतकरी, शेतमजूर, व्यापारी व तळागळातील नागरिकांना वाटू लागले आहे. या तालुक्यातील सोनोरी गावचे प्रगतीशील शेतकरी नंदकुमार मडघे हे स्वतः भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. यांची व्यथा अंगावर शहारे निर्माण करणारी आहे. भाजपाच्या नेत्याची ही व्यथा आहे. तर बाकीच्यांचा विचार न केलेला बरा. अगोदरच अनेक विवंचनेत शिवाय कर्जबाजारीपणात जीवन जगण्याच्या शेतकऱ्यांसमोर या भाजप सरकारने आपले उदासीन धोरण उभे केले व निसर्ग सुध्दा गेल्या ४-५ वर्षापासून त्यांचा पिच्छा सोडत नसल्यामुळे आज तो पूर्णता खचून गेला आहे.मात्र शासनाला याचे काही सोयरे सुतक नाही.

मि प्रथम शेतकरी : नंदकुमार मडघे

आपली आपबिती सांगणारे शेतकरी व भाजपा नेते नंदकुमार मडघे यांना काल येथील खरेदी विक्री संघाचे सभागृहात आमचे तालुका प्रतिनिधीने त्यांची व्यथा जाणून घेवून बोलते केले तेव्हा आपल्या शासनाचे धोरण शेतकऱ्याप्रती उदासीन असल्याचे स्पष्ट करीत मी प्रथम शेतकरी आहो म्हणून याची ग्वाही दिली.

या शेतकऱ्याकडे एकंदर२३ एकर शेती असून यात संत्रा, केळी व बरोबरच ३ एकर शेतात टमाटरसाठी त्यांना एकंदर ९ लाख रुपये (आजपर्यंत) खर्च आला. तोडणी व बाजारात विक्रीसाठीचा खर्च बघता शिवाय भाव २ रुपये प्रति किलोने टमाट्याची विक्री मुळे अखेर त्यांनी बहरलेले झाडावरील टमाटे तोडनेही बंद केले व झाडेही उपडून जनावरांना टामटे खाण्यासाठी रस्त्यावर फेकत आहे. अशा या चक्रव्यहात आजच्या घटकेला या तीन एकरातील खर्च ९ लाख तर विक्री दोन लाख अशी दयनावस्था पत्रकारांना त्यांच्या शेतात जावून दिसून आली. मागील वादळी पावसामुळे त्यांची संत्रा बाग व केळी उध्दवस्त झाली. त्यांच्या आशेवर पाणी फेरल्या गेले. मी आता असलेले कर्ज कसे भरणार असा प्रश्न त्यांनी केलो. या उद्भवलेल्या परिस्थितीला अनुसरून मडघे यांनी शासनाच्या धोरणाचा एक प्रकारे निषेधच केला आहे. शेतकऱ्यांना गांजर दाखविणारे भाजपाचे शासन असल्यामुळे शिवाय शेतकरी व भाजपाचे ज्येष्ठ नेते असल्यामुळे आ बैल मुझे मार यानुसार नंदकुमार मडघे मुका मार आपल्या शासनाचा सहन करीत आहे. या भेटी दरम्यान खरेदी विक्रीचे अध्यक्ष शिवाजी बंड, शेतकरी नेते राष्ट्रवादीचे सुरेश विधाते, संचालक संजय गुर्जर आदी उपस्थित होते.

महिला वाहकावर चाकूहल्ला प्रकरण

# पोलिस अधीक्षक यांना निर्भया समितीचे निवेदन कडक कारवाई करण्याची मागणी



अमरावती:- काही दिवसांपासुन राज्य परिवहन महामंडळाच्या कामगारांन वर प्राणघातक हल्ले होण्यात वाढ झाली आहे गेल्या दोन आठवड्यांपासून अमरावती जिल्ह्यातील ही तिसरी घटना घडली आहे. आरोपी राजकीय दबाव आणून व ईतर मार्गाचा अवलंब करून प्रकरणी पासून सुटका घेत आहे .असे अमरावती जिल्ह्यातील निर्भया समिती महिला सदस्या नी पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांना निवेदनाद्वारे माहीती दिली

दि. २० /३/२०१८ रोजी अमरावती आगाराचे बस क्र एम एच ४०/ ९३०० अमरावती दाभेरी मार्गावर धावत असतांना ११.३०ते १वा च्या दरम्यान दाभेरी फेरीवर एक महीला प्रवासी यांना बस मध्ये गर्दी असता सौजन्यता दाखवत या महिला वाहनाच्या विनंती करुन सुद्धा माथेफिरू महिला प्रवाशासी वाद निर्माण झाला सदर माथेफिरू महिला प्रवासी वाहका विरुद्ध आपल्या मुलाला घटना उत्तेजकपद्धतिने व चुकीची माहिति सांगुन महिला वाहकावर प्राणघातक चाकुहल्ला करण्यास प्रवृत्त केले आणि महिला वाहकाला तु थांब तुला दाखवते म्हणुन धमक्या दिल्या शिवीगाळ केली यावी बस थांब्यावर सदर माथेफिरू महिलेचा मुलगा आला आणि सपासप महिला वाहकावर चाकुने वार करुन जिव घेण्याचा प्रयत्न केला सदर घटनेत महिला वाहक गंभीर जखमी झाली असून या घटनेमुळे महिला कामगारांना असुरक्षित तेचि भावना वअसंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे .

सदर घटनेतील प्राणघातक हल्ला करणार्या पुरुषा आरोपी सोबत च माथेफिरू महिला प्रवासी सुध्दा तितकीच दोषी आहे. या दोघांवर कडक कारवाई करण्यात यावी व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात यावा असे निवेदनाद्वारे निर्भया समिती महिला सदस्या प्रमुख सुनंदा सरोदे, दिपमाला गोलाईत, सविता इंगोले, संगीता शेंदूर, वैशाली वानखेडे, चारुदत्त धुमाळ, शिल्पा कावळे, शितल कावळे, शितल मोहोड,वैशाली उके, वर्षा अळणे,सदाफळे,मंजु खंदारे, श्रुती भागवत, वर्षा ठाकरे, भारती, चव्हाण, तांबूल, छाया आंधळे, छाया लाटेवर, सोळंके, विद्या मोरे,,किरण सानप, वैशाली गवई, दाभाडे, सीमा ठाकणे,सिमा शेंडे, सुनिता कवाने,साधना मुंद्रे, अर्चना वासनकर, लता वाठोनकर, राजगुरे, तायडे, महाजन, पगारे, खोडे, गेडाम, ढाले, खरकाळे अमरावती, बडनेरा, परतवाडा, मोर्शी येथील उपस्थित होत्या

# इस्कॉनतर्फे श्रीराम नवमी महामहोत्सव

**अमरावती दि.२२:** श्री श्री रुख्मिणी द्वारकाधीश अध्यात्मिक संस्कार केंद्र (इस्कॉन) तर्फे श्रीराम नवमी महामहोत्सव दि.२५ मार्च रोजी संपन्न होणार आहे. महामहोत्सवाची सुरूवात दि.२५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता श्री श्री सिताराम लक्ष्मण हनुमान यांच्या महाअभिषेकाने होईल.

त्यानंतर ७ वाजता श्रीरामकथा होईल. त्यानंतर रात्री ९ वाजता महाआरती व ५६ भोग दर्शन होईल. त्यानंतर ९.१५ वाजता महाप्रसादाने संपूर्ण महामहोत्सवाची सांगता होईल. या संपूर्ण महामहोत्सवाचा लाभ सर्व अमरावतीवासीयांनी घ्यावा असे आवाहन इस्कॉनतर्फे करण्यात आले आहे.



# उमाकांत सावरकर गुरुजी यांचे निधन



दर्यापुर-दर्यापुर येथील संत अछूत महराज सत्संग मंडलाचे जेस्ट कार्यकर्ते तथा आदर्श हायस्कूल क म वि चे सेवा नियुक्त शिक्षण उमाकांत नथुजी सावरकर यांचे अल्पशा आजराने दुखद निधन झाले मृतु समई त्यांचे वय ७८ वर्ष होते ते अ भा प्रा शि संघ जेस्ट मार्गदर्शक तथा राजेन्द्र सावरकर यांचे ते वडील होते त्याच्या पछः चात आई दोन मुले राजेन्द्र व विजय सावरकर व एक मुलगी नातू नातवंड बराच मोठा आप्त परिवार आहे

अकोट रोड वरील मोक्ष धाम येथे अग्नि देण्यात आला त्याप्रसंगी गजानन मेहरे पंडितराव देशमुख राज्य संघठनेचे उपाध्यक्ष किरण पाटिल अमरावती राजेन्द्र अन्ना साहेब रेचे गयगोले गजानन देशमुख आदि सह उपस्थित सर्वानी भाव पूर्ण श्रधांजलि अर्पण केली.

आज से भव्य शुभारंभ
eORBIT HOUSEFULL FUN
३ खेळ १।, ५।।।, १० बजे






आज पासून भव्य शुभारंभ
Rajlaxmi
रोज ४ खेळ १२।,३।,६।,९। वाजता
BIG Cinema Rajesh
१२.३० बजे



आज से भव्य शुभारंभ
eORBIT HOUSEFULL FUN
थ्रीडी
११,३।,८ बजे
PRABHAT AIR CONDITIONED
१२।।,३।।,६।। ९।। बजे
BIG Cinema Rajesh
थ्रीडी ३।।, ६।।, ९।।




आज पासून भव्य शुभारंभ
eORBIT HOUSEFULL FUN
रोज १ खेळ १२.१५ वाजता



राघव सिनेफ्लेक्स, तळेगाव
रोजाना ४ खेल १२,३,६, ९ बजे




## अमरावती बाजार भाव

**किराणा बाजार**
**दुर्गादास किशोरकुमार**
**डॉ. मिश्रा यांचे समोर**
**सक्करसाथ, अमरावती.**

| | |
|---|---|
| साखर एस | ३५५०-३६६० |
| साखर एम | ३६००-३६२० |
| गुळ | २३००-२६०० |
| मसुरदाळ | ४५००-४६०० |
| चनादाल | ४७५०-४८०० |
| मुंगदाळ | ५८००-६२०० |
| तुवरदाळ | ५८००-६२०० |
| बरबटी दाळ | ३५००-४६०० |
| मटकी | ४१००-४९०० |
| मुंग मोगर | ६२००-६५०० |
| उडद मोगर | ५४००-५५०० |
| तांदूळ लुचई | २२००-२४०० |
| तांदूळ कोलम | ४८००-५२०० |
| हिरवा वाटाणा | ४३००-४५०० |
| बेसन चरखा (४०किलो) | २०२२ |
| बेसन स्वस्तीक (४०किलो) | २०२२ |
| रस्सी बंडल | ५५०-६०० |
| सोप | १४०-१८० |
| जीरा | २००-२२० |
| रद्दी | १४०-१७० |
| खोबरेल तेल | १५००-२००० |
| आटा (५० किलो) | १०२०-११६० |
| रवा (५० किलो) | ११२०-११४० |
| मैदा (५० किलो) | ११२०-११७० |
| नारियल ओला | २००० |
| २०० भरती | -- |
| प्रकाश ब्रँड | १४५० |
| शुध्द ब्रँड (सोयाबीन) | १११० |
| साबूदाना | ४२०-५२० |
| भगर | ५१०-६०० |
| फटका दाळ | ६२००-६४०० |

**तेल बाजार**
**भगवानदास नथमल**
**फोन:२५७२१४१/२५७८१४१**

| | |
|---|---|
| फल्ली तेल | १००-०० |
| सोयाबीन तेल | ७०-०० |
| माजी तेल १ लि.(एगमार्क) | १२५ |
| २४ कॅरेट १लि. | ७३-०० |
| सरकी रिफाईन | ७४-०० |
| खोबरेल तेल | १५०-०० |

**१५ किलोचे भाव**

| | |
|---|---|
| माजी | २०००-०० |
| फल्ली तेल | १७००=०० |
| अशोक ब्रँड | १६००=०० |
| शुद्ध सोयाबीन | ११००=०० |
| सरकी रिफाईन | १०९०=०० |
| खोबरेल तेल | १६००=०० |
| सुनेहरा ड्रॉप | १३००=०० |

**१०० किलोचे भाव**

| | |
|---|---|
| फल्ली तेल | ११०००=०० |
| सोयाबीन | ७०००=०० |

**प्रल्हाद ना. अग्रवाल**
**फोन २६६३०९७/२६६३०९६**

| | |
|---|---|
| सरकी (प्रति क्विंटल) | १६००-१९०० |
| सरकी ढेप (प्रति क्विं.) | १५००-१७०० |

| | |
|---|---|
| कांदा(गावरानी) पांढरा | ८००-१२०० |
| कांदा (नाशिक) | ७००-१००० |
| आलु(पांढरा) | ६००-९०० |
| आलू लाल | ७००-१००० |
| लसून | २०००-३५०० |
| अद्रक | २०००-२५०० |
| टमाटर | ६००-७०० |
| वांगे | ७००-८०० |
| फुल गोबी | ५००-६०० |
| पत्ता गोबी | ४००-५०० |
| पालक | ३००-४०० |
| मेथी | ७००-८०० |
| कारला | २६००-२८०० |
| बरबटी शेंगा | ३५००-४००० |
| काकडी | १४००-१६०० |
| सांभार | ८००-१००० |
| भेंडी | २८००-२८०० |
| सुकी मिरची | ६०००-९००० |
| हिरवी मिरची | ४६००-५००० |
| मिरची शिमला | २२००-२६०० |
| कोहळ | १००-१२०० |
| गवार | -- |
| गांजर | ८००-१००० |
| ढेंमसे | - |
| वाटाना ओला | - |

**फळ मार्केट**

| | |
|---|---|
| सेफ | ५०००-७००० |
| पेरु | - |
| चिकू | १०००-२००० |
| हिरवा चना | ८००-१००० |
| मोसंबी | - |
| निंबू | ८००-१००० |
| पपई तायवान | १२००-१८०० |
| अनार | - |
| साधे बोर | - |
| अनानस | - |
| टरबूज | - |
| खरबूज | १२००-१६०० |

## कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती

**धान्य विभाग फोन २५७२०२४, २५७२१७८**

| | | | |
|---|---|---|---|
| ज्वारी (गावरानी) | १५००-१८०० | हरभरा (जॅकी) | ३५००-३८०० |
| ज्वारी (संकरीत) | ११५०-१४०० | बाजरा | १६००-१८५० |
| गहू (लोकवन) | १८००-२१२५ | सोयाबीन (नवीन) | ३२००-३७५० |
| गहू (नर्मदा) नवीन | २४००-२६५० | नवीन चना | --- |
| गहू (१४७) नवीन | १७५०-२००० | सिड सोयाबीन | -- |
| तूर (लाल) | ४१००-४४५० | तीळ (पांढरी) | ६५००-८५०० |
| तूर (मिडीयम) | ३७००-४००० | तीळ (गजर) | ४८००-५८०० |
| मुंग नवीन | ३५००-३८५० | मका (लाल) | १०५०-११५० |
| मुंग मोगलाई | -- | जवस | - |
| मुंग नवीन ( चमकी) | ४१५०-४५५० | भुईमुंग (तिज्या) | -- |
| उडीद (नविन) | २५००-३२०० | भुईमुंग १२-२४ नवीन | - |
| हरभरा (पिवळा) | ३५००-३६०० | जपानी भुईमुंग | - |
| | | कापुस | ४३००-४८५० |